


Deccan Education Society, Pune
Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj College of Agri-Business Management, Sangli
Institute for Applied Research and Development in Agriculture (IARDA), Sangli
Mahatma Phule Krishi Vidyapeeth, Rahuri
Title of Research: Effect of Foliar Application of Different Nutrient Sources on Growth Yield and Quality of Groundnut (Arachis hypogaea L.) on Medium Black Soils of Western Maharashtra
Objectives:
Experimental details:
Layout:
Treatment Details:





सांगली येथील डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय व कृषी विकास आणि संशोधन संस्था यांच्यातर्फे आज भुईमुगावरील संशोधन चाचणी सुरु करण्यात आली. या कार्यक्रमाचे उदघाटन संस्थेचे नियामक मंडळ सदस्य मा. श्री. रविंद्र ब्रह्मनाळकर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्या, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

ही चाचणी कसबे डिग्रज कृषि विज्ञान केंद्राच्या मृदा शास्त्र विभागातील डॉ. संग्राम काळे यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे. महाविद्यालयातील डॉ. आकाश म्हेत्रे, प्रा. मल्लिकार्जुन कोळी आणि श्री. अमित पाध्ये यांच्याद्वारे ही चाचणी घेतली जाणार आहे. भुईमुगाच्या अन्नद्रव्य व्यवस्थापनातून उत्पादनासह विविध परिमाणांवर आधारित ही संशोधन चाचणी होणार आहे. बाजारामध्ये नवीन उपलब्ध झालेल्या नॅनो युरिया आणि नॅनो डीएपी यांच्या शिफारसीनुसार फवारणीची तुलना उपलब्ध विद्राव्य खतांच्या फवारणीशी करून त्याचे उत्पादनासह विविध परिमाणांवर आधारित बदल नोंदविणे हे या चाचणीचे मुख्य उद्दिष्ट आहे. या चाचणीमुळे सामान्य शेतकऱ्यांच्या नॅनो युरिया आणि नॅनो डीएपी या खतांच्या वापरासंबंधी अनेक शंकांचे समाधान होईल असे डॉ. आकाश म्हेत्रे यांनी याप्रसंगी सांगितले.